P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

## प्रेसनोट दिनांक - १२/१२/२०२३

### दि.११/१२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १०५२/२०२३ भादवी का क ३९५,३२३, ४२७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/१२/२०२३ रोजी १६/०० वाचे सुमार तळेगांव चौक चाकण येथिल सिग्नस लागलेला असताना तळेगांव ब्रिजवर थांबलो असताना |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/१२/२०२३ रोजी १४/३७ वा |
| फिर्यादी | :- | उजमा अब्दुल रहिमान पठाण वय ३० वर्षे व्यवसाय - वकील रा. बादशाह तलाव जुन्नर ता.जुन्नर जि. पुणे |
| आरोपी | :- | १)अनोळखी दोन इसमाने<br>२)इतर सहा अनोळखी इसम<br>**निष्पन्न आरोपी-**<br>१)सोनाजी लाला मिरपगार वय ३१ वर्षे रा.संजय गायकवाड यांचे भाडयाचे खोलीत महात्मा फुलेनगर मार्केटयार्ड चाकण ता.खेड, जि.पुणे मुळ रा.मु.पो. दैठण ता.गेवराई जि. बीड<br>२)दिपक गणेश वैरागे वय २२ वर्षे रा.महात्मा फुलेनगर मार्केटयार्ड चाकण ता.खेड,जि.पुणे मुळ रा.मु.पो सोनीजवळ ता.केज जि.बीड<br>**आरोपी क्र १ व २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे तळेगांव चौक चाकण तेथील सिग्नलवर होन्डा सिवीक कंपनीची गाडी नंबर एम एच ०४ ई डी ५४७३ घेवुन थांबले असता यातील अनोळखी दोन इसमाने फिर्यादी यांचे गाडीजवळ आले त्याचे पाठोपाठ इतर सहा अनोळखी इसम आले व आम्हाला कट का मारला असे म्हणुन फिर्यादी यांचा गाडी चालक नामे सद्दाम मुन्नीर शेख यांस हाताने लाथाबुक्याने मारहान करुन त्यातील काळे शर्ट घातलेल्या इसमाने फिर्यादी यांच्या गळ्यातील ३०,०००/- रू किंमतीची पिवळ्या धातुची चैन ओढुन घेवुन पळुन गेला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि ज-हाड,८३०८०७८९०९ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी एमआयडीसी ६३५/२०२३ भा.द.वि.कलम ३५४,५०४, ५०६,५०९ बालकांचे लैगिंक शोषणापासुन संरक्षण अधिनियम कलम १२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/१२/२०२३ रोजी १७/३० वा चे सुमारास समाज मंदीराच्या पाठी मागील गल्ली, संजयगांधी नगर,मोशी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/१२/२०२३ रोजी २१/१९ वा. |
| फिर्यादी | :- | **महिला फिर्यादी** |
| आरोपी | :- | अक्षय ऊर्फ टकल्या सुधाकर गायकवाड वय २६ वर्षे,रा. संजयगांधीनगर झोपडपट्टी मोशी, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी वय ११ वर्षे, ही किराणा खरेदी करुन घरी येत असताना आरोपी याने तिचा टॉप पकडुन तिला जवळ ओढुन मिठी मारुन तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल अशी वर्तणुक केली तसेच यापुर्वी तिला अश्लील हातवारे करुन डोळा मारुन तिचा विनयभंग केला आहे व फिर्यादीची ननंद ही जाब विचारण्यासाठी गेली असता तिला शिवीगाळ करुन घरच्यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि तरंगे ८३२९११९२९४ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ६४२/२०२३ भा.द.वि. कलम ३२४,३२३, ५०४,१४१, १४२,१४३, १४४,१४७, १४९ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/१२/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा. चे सुमा सर्व्हे नंबर १००/१अ/२ वाल्हेकरवाडी पीसीएमसी दवाखानाचे मागे तुपे चाळ वाल्हेकरवाडी पुणे ३३

गुन्हा दाखल :- दि.११/१२/२०२३ रोजी ०४/१४वा.

फिर्यादी :- दत्ता लक्ष्मण तुपे वय ४३ वर्षे धंदा नोकरी रा. पीसीएमसी दवाखाना मागे तुपे चाळ वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे

आरोपी :- १) आकाश भिमसेन तुपे वय ३२ वर्षे २)शंकर जगन्नाथ तुपे वय ३० वर्षे
३) संतोष जगन्नाथ तुपे वय ३२ वर्षे ४) महिला आरोपी
५) महिला आरोपी ६) महिला आरोपी ७) महिला आरोपी रा.सर्व सदर
**सी आर पी सी ४१ (१) ची नोटीस दिली आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे नातेवाईक आरोपी क्र १ ते ७ यांना घरामध्ये भिंत पाडुन बोर मारण्यास सुरवात केल्याचा जाब विचारुन काम थांबविण्यास सांगीतले असता त्यांनी संगणमत करुन फिर्यादी यांचे मुली व मुलाला शिवीगाळ करुन मारहान करुन जखमी केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मोरे ९८५०४८२०२०

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७९२ /२०२३ भा.दं.वि. कलम ३२४,३२३,५०४,३४. प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/१२/२०२३ रोजी १५/०० वा.चे सुमा. सिमेंट ग्राउुड कृष्णानगर चिचवंड पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/१२/२०२३ रोजी०१/०९ वा.

फिर्यादी :- श्री.सार्थक नानासाहेब पाटिल वय १९ वर्ष,धंदा-शिक्षण,रा.गुरुकृपा हौसीग सोसायटी, मनिषा हौसीग सोसायटी,मोरेवस्ती चिखली पुणे

आरोपी :- प्रथमेश खंडागळे वय २०वर्ष रा.संतकृपा सोसायटी मोरेवस्ती चिखली पुणे मो.नं.८७६६७४०२४५ व त्यांचे दोन साथीदार नाव पत्ता माहीत नाही
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी मजकुर यांने फिर्यादी यांचेकडे त्यांचा चष्मा मागीतला असता तो फिर्यादी यांने आरोपीस “तुझा चष्मा माझ्या मित्राकडे आहे संध्याकाळी आणुन देतो असे म्हणाला असता, त्यांचा राग आरोपी यास आल्याने त्यांने त्यांचे दोन साथीदारासह फिर्यादीस वाईट शिवीगाळ करुन लाकडी बाबुने डाव्या हातास व तिन बोटास मारुन जखमी केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा होले ९८८१४९७७८५

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ६४५ /२०२३ भा.दं.वि.कलम-३५३,३३२मोटार वाहन कायदा कलम,३(१)१८१,५,/१८०प्रमाणे,

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.११/१२/२०२३ रोजी १७/०० वा.चे सुमारास रेलविहार हौसिंग सोसायटी बिजलीनगर चिंचवड पुणे.

गुन्हा दाखल :- दि.११/१२/२०२३ रोजी २२/५७ वा.

फिर्यादी :- माधुरी संदिप पंडीत वय,५४ वर्षे,धंदा.नोकरीः-मुख्य लिपीक पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड

आरोपी :- तीन चाकी गाडी क्रमांकः- एम. एच.१४ जेपी. ६४०५ वरील चालक नामे अब्दुल सलीम चौधरी वय,१५ वर्षे,रा.रेल्वे पटरी बिजलीनगर
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी प्राप्त तक्रारीच्या अनुशंगाने फिर्यादी या अतिक्रमण विभागाकडील धडक कारवाई पथकातील स्टाप सह रेलविहार हौसिंग सोसायटी समोर बिजलीनगर चिंचवड पुणे येथे पिंपरी चिंचवड

महानगरपालिकाकडील कोणताही परवाना नसताना सार्वजनिक रोडवर लोकांना अडथळा होईल अशा स्वरुपात वाटाणा भाजी विकत असलेल्या तीन चाकी गाडी क्रमांकः- एम.एच.१४ जेपी.६४०५ वरील चालक आरोपी याच्याकडे कोणतेही वाहन चालविण्याचा परवाना नसताना आरोपी याने शासकीय कर्तव्य करण्यापासुन परावृत्त करण्याच्या उद्देशाने सरकारी कामात अडथळा आणुन शासकीय कर्तव्य करीत असलेल्या रणजित दामोदर हिरवे यांना धक्का मारुन खाली जमिनीवर पाडुन त्याच्या पायावरुन गाडी घालुन त्यांना जखमी करुन पळुन गेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि व्हरकाटे ९९२११३७६४७

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ६४३/२०२३ भादंवि कलम ३२४,३२३, ५०४,५०६, १४१,१४२, १४३,१४४, १४७,१४९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/१२/२०२३ रोजी सकाळी ११/३० स.नं १०० /१अ/२ वाल्हेकरवाडी पीसीएमसी दवाखान्याच्या मागे तुपे चाळ वाल्हेकरवाडी

गुन्हा दाखल :- दि.११/१२/२०२३ रोजी २०/०९ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- १) दत्ता लक्ष्मण तुपे वय -४० वर्षे,
२) महादेव दत्ता तुपे,
३) गणेश तुपे,
४) मुलगी इंद्रायणी महेश सकाटे,
५) श्रध्दा दता तुपे
६) संगीता दत्ता तुपे
**सी आर पी सी ४१ (१) ची नोटीस दिली आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आकाश भिसे हा त्याच्या जागेमध्ये पिण्याच्या तसेच वापरण्याच्या पाण्याकरीता बोर(कुपनलिका) पाडत असताना सदर ठीकाणी बोर घ्यायचे नाही असे म्हणुन त्याचे नातेवाईक आरोपी क्र १ ते ६ यांनी सदर ठीकाणी येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केले तसेच फिर्यादी यांना बघुन घ्यायची धमकी देवुन यातील आरोपी क्र २ यांने दगडाने सोनी आकाश तुपे हीच्या मानेवर मारुन तीस जखमी करणेस कारणीभुत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मोरे ९८५०४८२०२०

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७९३/२०२३ भा.दं.वि. कलम २७९,३०४(अ),मो.वा.का.कलम १८४,११९/ १७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/१२/२०२३ रोजी १८.०० वा.चे सुमा.,महाराष्ट्र वजन काटा जवळ, कुदळवाडी चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/१२/२०२३ रोजी ०२/१९ वा.

फिर्यादी :- श्री.गौरव ओमप्रकाश त्रिपाठी वय १९ वर्ष, धंदा-नोकरी,रा.खराबवाडी,अमर केसवड यांची रुम, चाकण पुणे

आरोपी :- विठठल सोमनाथ हाके वय ४८वर्ष, रा.गेअर कंट्रोल कंपनीसमोर फुलेनगर चिचवंड पुणे

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे वडील नामे ओमप्रकाश सुर्यनाथ त्रिपाठी वय ४७ वर्ष रा.चौधरी वजन काटयाजवळील फुटपाथवर कुदळवाडी चिखली पुणे हे महाराष्ट्र वजन काटा कुदळवाडी चिखली पुणे येथे उभे असताना इसम नामे संजय बद्रीप्रसाद यादव यांचेकडुन समजले कि,त्यांना टाटा कंपनीचा ट्रक नंबर एम एच २१ एक्स १८९९ यावरील चालक आरोपी याने सदरचा ट्रक हा भरधाव वेगाने चालवून फिर्यादी यांचे वडीलांना धडक देवून त्यांना जखमी करुन मृत्युस कारणीभुत झाला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी एमआयडीसी ६३६/२०२३ भा.द.वि.स.कलम ४१९,४२० माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(क),६६(ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१६/८/२०२३ ते दि.२५/८/२०२३ मोशी येथे वॉनलाईन महीद्रां बॅकेचे लोन मंजुर करुन देतो असे म्हणुन वेळावेळी ऑनलाईन पैसे घेतलेबाबत |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/१२/२०२३ रोजी २१/५७ वा |
| फिर्यादी | :- | रामदास साहेबराव केदारे, वय ३८ धंदा नोकरी, राहाणार सिध्देश्वर आरंभ सोसायटी फ्लॅट नं.३०२, मोशी आंळदी बी.आर.टी रोड मोशी गावठाण, मोशी पुणे |
| आरोपी | :- | मो.नं ८८५०१८३६०८ धारक इसम मनिष पवार |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी सिध्देश्वर आरंभ सोसायटी मोशी येथे सन २०२२ साली फ्लॅट खरेदी केला होता. सदर फ्लॅट वरती फिर्यादी यांनी येस बॅंक कर्वे रोड पुणे येथे यांचेकडुन २३,५०,०००/- हजार रुपये होम लोन १०.४५ टक्के व्याजदराने ३० वर्ष मुदती करीता घेतले होते त्यांचा व्याजदर जास्त असल्याने फिर्यादी यांना कोटक महीद्रां बॅंके कडुन ८१०४५९७७९४ व ८८५०१८३६०८ धारक इसम आरोपी याने फोन करुन तुम्हाला कमी टक्के दराने लोन करुन देतो असे म्हणुन फिर्यादी यास विश्वास संपादन करुन त्यांचे कडुन वेळोवेळी गुगल पे नंबरवर ५०,९७१/- रुपये पैसे स्विकारुन फिर्यादी यांची अर्थीक फसवणुक केली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पांचाळ ८९२८३७६१०० |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १३९२/२०२३, भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि११/१२/२०२३ रोजी १६/३० वा चे सुमारास माणकडुन म्हाळुंगेकडे जाणा-या रस्त्यावर मुळा नदीचे पुलावर म्हाळुंगे ता. मुळशी जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ११/१२/२०२३ रोजी २२.२९ वा. |
| फिर्यादी | :- | नरेश आनंदराव बलसाने वय-५१ वर्षे, सहायक पोलीस उपनिरीक्षक नेमणुक हिंजवडी पोलीस ठाणे |
| आरोपी | :- | श्रीवर्धन विजय तिकोणे वय-२७ मु.पो. पौड पीडीसीसी बॅकेच्या शेजारी ता. मुळशी जि.पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी यांने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय दि.२७/११/२०२३ रोजीचे आदेशान्वये, पिंपरी चिंचवड शहरात पोलीस आयुक्तलय कार्यक्षेत्रात दि.२८/११/२०२३ रोजी ००:०१ वा.पासुन ते दि.११/१२/२०२३ रोजी २४:०० वा. पर्यंत कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशीलदगड अथवा शस्त्रे, अस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, लाठी, बंदुकाकिंवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग करुन, त्याचे स्वतःचे कब्ज्यात एकुण ६६,५००/- रुपये किंमतीचे ०१ लोखंडी पिस्टल व ०१ जिवंत काडतुसे (राऊंड) बाळगण्याचा कोणताही कायदेशीर परवाना नसताना सदरचे गावठी कटटा अवैधरित्या बाळगला असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गोमारे ९९२२७५६८२८ |